# दि हिंदुस्थान को- ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

## सभासदांना महत्वाची सूचना

१) बँकेकडे नोंद असणाऱ्या मोबाईल क्रमांकावर सभासदांना Login ID/User ID व पासवर्ड SMS द्वारे पाठविण्यात येईल. जेणेकरून सभासदांना लिंकद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होऊन ठरावावर 'मत' देता येईल.

२) सभासदांना इंटरनेट कनेक्शन असणाऱ्या डेस्कटॉप /लॅपटॉप / स्मार्ट फोनद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होता येईल.

३) AGM / Virtual AGM ची प्रक्रिया खालीलप्रमाणे असेल,

a) सभासदांना सभेकरिता ठरविण्यात आलेल्या वेळेच्या ३० मिनिटांपूर्वी Login करण्याची विनंती केली जाईल. म्हणजे दि. २७.०३.२०२१ रोजी सकाळी १०.३० पूर्वी.

b) दि. २७.०३.२०२१ रोजी विषय पत्रिकेवरील विषय सादर केल्यानंतर सभासदांना त्याच दिवशी दुपारी १.०० ते २.०० वाजेपर्यंत विषयानुसार प्रश्न https://hindusthanbank.eagm.cloud या लिंकवर पोस्ट करता येतील.

c) सभासदांनी दुपारी १.०० ते २.०० वाजेपर्यंत पोस्ट केलेल्या प्रश्नांना दि. २७.०३.२०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत प्रतिसाद देण्यात येईल.

d) दि. २७.०३.२०२१ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेत मांडण्यात आलेल्या ठरावांवर सभासदांना दुपारी २.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत मत देता येईल. e-Voting चा निर्णय सभासदांना त्याच दिवशी म्हणजे दि. २७.०३.२०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत त्याच वेब व्यासपीठावर जाहीर केला जाईल.

e) सदरची लिंक सायंकाळी ५.०० वाजता बंद केली जाईल.

४) महाराष्ट्र शासन सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग यांनी दि. २५.०२.२०२१ रोजीच्या परिपत्रकाद्वारे नागरी सहकारी बँकांना त्यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे VC/OVAM पध्दतीने आयोजन करण्याकरिता तज्ञ व्यक्ती किंवा एजन्सीची नियुक्ती करावी असे कळविले आहे. त्याप्रमाणे आपल्या बँकेने M/s. Tannum Consulting LLP या संस्थेची नियुक्ती केलेली असून त्यांना e-AGM चे आयोजन करणे तसेच सभेमधील ठरावावर ऑनलाईन पध्दतीने मतदान घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

५) सभे दिवशी सभेमध्ये सहभागी होण्याकरिता नोंदणी करतेवेळी काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास सभासद ९६१९२८०४५५ या क्रमांकावर सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत संपर्क करू शकतील अथवा techsupport@eagm.cloud या email ID वर email करू शकतात. बँकेने सभासदांच्या सोयीकरिता ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सभासदांनी या email वर फक्त Login/ Password संबंधीच चौकशी करावी. सदर एजन्सी सभासदांकडील नेटवर्क संबंधी असणाऱ्या अडचणी सोडविण्यास सक्षम नाही. तसेच सदर एजन्सी अजेंडा व बँकेसंबंधीच्या कोणत्याही चौकशांना प्रतिसाद देणार नाही, याची नोंद घ्यावी.

६) सभासदांनी आपले बदललेले पत्ते (रहिवासाच्या पुराव्यासह) संबंधीत शाखेत जाऊन नोंद करणे जरुरीचे आहे. तसेच ज्या सभासदांनी अद्यापपर्यंत बँकेत खाते उघडले नसल्यास त्वरित खाते उघडण्यासाठी नजीकच्या शाखेत संपर्क करावा.

७) सभासदांना विनंती करण्यात येते की, ज्या सभासदांनी आपले मोबाईल क्रमांक आणि Email Address अद्यापपर्यंत नोंदविले नाहीत, त्यांनी नजीकच्या शाखेत जाऊन अथवा बँकेने दिलेल्या Email Id वर नोंदवावेत.

८) सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, ज्या सभासदांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनानुसार अद्यापर्यंत KYC पूर्तता केली नसेल त्यांनी नजीकच्या शाखेशी संपर्क करावा.